Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# 'न' नियोजनाचा

13 May 2011, 0030 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यात एखादे काम यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी गरज असते ती नियोजनाची. नियोजनाद्व ारे वेळ, साधने, मनुष्यबळ या सगळ्यांची अशी आखणी केली जाते की कमीत कमी संसाधनांद्वारे लवकरात लवकर उद्दिष्टे गाठता येतील. नियोजन करण्यात अपयशी ठरणे म्हणजेच अपयशाचेच नियोजन करणे, हे वचन अगदी खरे आहे. नियोजन करणे म्हणजे पुढच्या काळाचा विचार करणे. याबाबत समर्थ रामदास सांगतात...

मेळवती तितुके भक्षिती। ते कठीण काळी मरून जाती।

दीर्घसूचनेने वर्तती। तेचि भले।।

जे केवळ आजच्यापुरता विचार करतात ते भविष्यातल्या संकटांना सामोरे जाऊ शकत नाहीत, जे दूरवरचा पल्ला ठेवून योजना आखतात तेच यशस्वी होतात.

काहीवेळा 'हे काम मी आजपर्यंत अनेकवेळा केले आहे, मला नियोजनाची गरजच नाही' असा युक्तिवाद काहीजण करतात. परंतु प्रत्येक नवी वेळ सारख्या वाटणाऱ्या कामातही नवीन पेचप्रसंग घेऊन येऊ शकते. बरेचसे घटक समान असले तरी काळाप्रमाणे काही घटक बदलतातच, या बदलांचा विचार करून प्रत्येकवेळी नवे नियोजन करणे जरूरीचे असते. याचा अर्थ नियोजन केल्याने जीवनात संकटे येत नाहीत असे नाही. पण प्रवास कुठे आणि कसा करायचा आहे हे कळल्याने त्या व्यक्तीला स्वत: रस्ता शोधणे सोपे जाते.

नियोजन करताना आणि स्वत:चे ध्येय ठरवताना व्यवस्थापकाला पुढील पाच गोष्टींचा विचार करावा लागतो : १) स्वत:च्या हिताचा विचार सर्वात महत्त्वाचा असतो. आपले अंतिम हित कशात आहे हे ओळखता यावे लागते. रामदास म्हणतात त्याप्रमाणे 'नरदेहाचे उचित। काही करावे आत्महित।' हे नेहमी लक्षात ठेवावे. २) व्यक्तिगत आणि कुटुंबाच्या एकत्रित गरजा लक्षात घेऊन मग नियोजन करावे. व्यक्तिगत गरजांनुसार ध्येय बदलू शकते. आज आपले उत्पन्न आणि खर्च यांचे प्रमाण कसे आहे ते पाहून भविष्यातील नियोजन करता येते. 'आहे तितुके जतन करावे। पुढे आणखी मिळवावे' अशा शब्दात रामदासांनी हाच विचार सांगितला आहे. ३) नियोजन परिणामकारक ठरावे म्हणून त्यासाठी लागणारा कालावधी विचारात घेणे आवश्यक असते. एखादी कंपनी ज्याप्रमाणे संपूर्ण आर्थिक वर्षाची विभागणी चार तिमाही भागांमध्ये करते आणि त्या त्या तिमाहीचे नियोजन वेगवेगळे करते तसे बदलत्या काळाचा विचार करून वैयक्तिक जीवनाचे नियोजन करावे. ४) ध्येय ठरवताना उपलब्ध असलेल्या साधनांचा विचार महत्त्वाचा असतो. जीवनाचे नियोजन करताना शिक्षण, अधिकार, लोकसंपर्क, आर्थिक क्षमता या सर्व साधनांचा विचार करावा लागतो. यासंदर्भात रामदास म्हणतात, जैसी विद्या तैसी हांव। जैसा व्याप तैसे वैभव।

तोलासारिखा हावभाव। लोक करिती।।

अर्थात, एखाद्या व्यक्तीची महत्त्वाकांक्षा तिच्या ज्ञानाप्रमाणे कमी जास्त असते, तर त्या व्यक्तीचे वैभव, तिने किती परिश्रम घेतलेत यावर अवलंबून असते आणि या सगळ्यावरूनच त्या व्यक्तीचे समाजातील स्थान ठरत असते. ५) आयुष्यात ठरवलेले ध्येय गाठण्यासाठी इच्छाशक्ती हवी. एकवेळ साधने कमी पडली तरी प्रचंड इच्छाशक्तीच्या जोरावर तुम्ही तुमचे ध्येय गाठू शकता. गंमत म्हणजे व्यवहारात अनेकजण फक्त साधने गोळा करण्याचाच प्रयत्न करताना दिसतात, इच्छाशक्ती वाढवण्यासाठी फारच थोडे प्रयत्न करतात. म्हणूनच रामदास म्हणतात,

जेणे जैसा निश्चय केला।

तयासी तैसाचि फळला।

पीटर ड्रकर या आधुनिक व्यवस्थापन गुरूने प्रचलित केलेल्या 'मॅनेजमेंट बाय ऑब्जेक्टिव्हज' या शैलीत कंपनीच्या ध्येय धोरणांशी प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या तात्कालिक लक्ष्याची सांगड घातली जाते. कोणतेही नियोजन व्यवस्थापन यशस्वी व्हायचे असेल तर मुळात लक्ष्य माहित हवे.

म्हणून रामदास म्हणतात, ऐक ज्ञानाचे लक्षण। ज्ञान म्हणजे आत्मज्ञान।

पाहावे आपणासि आपण। या नाव ज्ञान।

स्वत:ला ओळखल्याशिवाय, स्वत:चे ध्येय नक्की केल्याशिवाय सुनियोजित व्यवस्थापन शक्य नाही.

- सुधीर निरगुडकर

Network Access Message: The page

Tweet या बातमीला ट्विट करा

**या बातमीवर तुमचं मत मांडण्यासाठी** इथे क्लिक करा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap

Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service

This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768